epaper.deshdoot.com/v

# प्रगती विद्यालयात सायबर सिक्युरिटी जनजागृती

खिरोदा, ता.रावेर । वार्ताहर – येथील लोकशिक्षण मंडळ संचलित प्रगती विद्यालय रोझोदा येथे दि.१९ जुलै रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठ, जळगाव यांच्यावतीने सायबर सिक्युरिटी या जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठ, जळगाव येथील सायबर सिक्युरिटी या अभ्यासक्रमाचे विद्यार्थी देवेंद्र कापडे आणि भावेश कोळी उपस्थित होते. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेच्या बाबतीत विविध उदा. देऊन मार्गदर्शन केले. त्याचबरोबर जनजागृती पर उद्बोधनही केले. सायबर गुन्ह्या पासून स्वतःला सुरक्षित कसे ठेवावे याबाबत अत्यंत महत्त्वाची माहिती या प्रसंगी विद्यार्थ्यांसह शिक्षकांना देण्यात आली .विद्यार्थी व शिक्षक यांनी विविध प्रश्न उपस्थित करून आपल्या शंकांचे समाधान करून घेतले.